**MHKO050033812018**

## नियमीत दिवाणी दावा क्र. ३२४/२०१८ मधील
## निशाणी क्र.१३ खालील आदेश

प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्जाद्वारे आज दिनांक ०६/०२/२०१९ रोजी झालेला विना कैफियत आदेश रद्द करुन कैफियत दाखल करण्याची परवानगी मागितली आहे.

०२. प्रतिवादी अर्जात कथन करतात की, प्रस्तुतचे काम आज रोजी मे. न्यायालयात कैफियत दाखल करणेवर नेमले आहे. सदर प्रतिवादी मे. न्यायालयात ११ वाजून ८ मिनिटांनी हजर होते, मात्र मे. न्यायालयात स्टेटमेंट रेकॉर्डींगचे काम चालू असलेने दरवाजा बंद होता. त्यानंतर प्रतिवादी मे. न्यायालयात पुन्हा १२.०० वाजता हजर राहिले असता, त्यांचेविरुध्द विना कैफियतचा आदेश पारीत करणेत आला. सबब, प्रतिवादींनी विना कैफियतचा आदेश रद्द करुन कैफियत दाखल करण्याची परवानगी मागितली.

०३. वादींनी प्रस्तुत अर्जास म्हणणे देवून हरकत नोंदविली आहे. वादींनी अर्जातील संपुर्ण कथने नाकारलेली आहेत. सबब, वादींनी अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

०४. उभय पक्षकारांतर्फे करण्यात आलेला युक्तीवाद ऐकला.

०५. प्रकरणाचे अवलोकन केले, प्रस्तुतचा दावा वादींनी, प्रतिवादींविरुध्द खरेदीपत्र पुर्ण होवून मिळण्यासाठी व कायम मनाईसाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादींना दिनांक ०२/११/२०१८ रोजी निशाणी क्र.६ अन्वये समन्सची बजावणी झालेली आहे. परंतु, प्रतिवादी मुदतीत कैफियत सादर करु शकलेले नाहीत म्हणून त्यांचेविरुध्द आज दिनांक ०६/०२/२०१९ रोजी कैफियत नाही असा आदेश पारित करण्यात आलेला होता.

०६. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ८, नियम १ प्रमाणे प्रतिवादींना दाव्याचे समन्सची बजावणी झालेपासून ३० दिवसांच्या आत अथवा न्यायालयाच्या परवानगीने जास्तीत जास्त ९० दिवसांत कैफियत सादर करता येते. परंतु, प्रस्तुत प्रकरणाचे अवलोकन केले असता प्रतिवादींना दिनांक ०२/११/२०१८ रोजी समन्सची बजावणी

झालेली आहे व प्रतिवादींनी प्रस्तुतचा अर्ज दिनांक ०६/०२/२०१९ रोजी दाखल केलेला आहे. प्रतिवादींना जवळ-जवळ ४ दिवसांचा विलंब झालेला आहे. मुदतीचा कायदा कलम ५ प्रमाणे विलंबासाठी संयुक्तीक कारण नमुद करणे आवश्यक असते. प्रस्तुत प्रकरणात प्रतिवादी यांनी न्यायालयात हजर असल्याचे कारण सांगितलेले आहे. परंतु, दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ८, नियम १ प्रमाणे ९० दिवसांत कैफियत दाखल करणे आवश्यक आहे. प्रतिवादींना समन्सची बजावणी झाल्यापासून ९० दिवसांचा कालावधी ०२/०२/२०१९ रोजी संपलेला आहे. प्रतिवादींनी ४ दिवसांच्या विलंबाबाबत संयुक्तीक कारण नमुद न करता न्यायालय स्टेटमेंट रेकॉर्डींगमध्ये व्यस्त असल्याचे कारण नमुद केलेले आहे. प्रतिवादींनी ९० दिवसांच्या कालावधीमध्ये कैफियत का सादर करु शकलेले नाहीत याबाबत स्पष्टीकरण देणे आवश्यक आहे. त्याऐवजी प्रतिवादींनी न्यायालयच स्टेटमेंट रेकॉर्डींगमध्ये व्यस्त असल्याचे कारण नमुद करुन योग्य स्पष्टीकरण देण्याची जबाबदारी टाळत आहेत, त्यामुळे अर्जातील कारण हे योग्य व संयुक्तीक कारण मला वाटत नाही. परंतु, प्रकरणाची गुण-दोषावर निर्गती करण्यासाठी प्रतिवादींना त्यांचा बचाव मांडणेकामी संधी देणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे. त्यामुळे, प्रतिवादींना त्यांची कैफियत सादर करुन देणे मला योग्य वाटते. प्रतिवादींनी विलंबाबाबत संयुक्तीक कारण दिलेले नाही, त्यामुळे त्यांच्यावर विलंबाचा खर्च ठेवणे योग्य होईल. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

## आदेश

१) अर्ज (निशाणी क्र.१३) रक्कम रु. १,०००/- च्या खर्चासह मंजुर करण्यात येतो.

२) खर्चाची रक्कम वादींना देण्यात यावी.

३) खर्चाची रक्कम वादींना दिल्यानंतर प्रतिवादींना कैफियत सादर करण्याची परवानगी देण्यात येत आहे.

(खुल्या न्यायालयात जाहिर करण्यात आला)

सही/-

दिनांकः ०६/०२/२०१९
इचलकरंजी.

**( पी.एम.माने )**
६वे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
इचलकरंजी.

I affirm that the contents of this P.D.F file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of stenographer | R. D. Patil |
| Name of Court | P. M. Mane,<br>6th Jt. Civil Judge Jr. Dvn. and Judicial Magistrate First Class, Ichalkaranji. |
| Date of Dictation | 06/02/2019 |
| Judgment signed by P.O. on | 06/02/2019 |
| Judgment uploaded on | 07/02/2019 |